# !!''वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे''!!

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावणा | ०३ |
| २ | आमची प्रेरणा | ०५ |
| ३ | संकल्प व महासंकल्प | १० |
| ४ | पालखी महामार्ग नकाशा | १४ |
| ५ | हरित वारी पालखी महामार्ग मंगळवेढा – पंढरपूर | १५ |
| ६ | या कार्यात सहभागी वृक्षप्रेमी संस्था / व्यक्ती. | २२ |
| ७ | परिशिष्ट १ | २३ |
| ८ | परिशिष्ट २ | २५ |
| ९ | संदेश | २७ |
| १० | हरित वारीसाठी संपर्क तपशिल | २८ |
| ११ | समारोप | २९ |

# प्रस्तावणा

आज संपूर्ण जगातील अखिल मानव जाती समोर अतिसंवेदनशील व भविष्यातील निर्माण होणाऱ्या धोक्याचा अर्थातच पर्यायाने संपूर्ण जीवसृष्टीच्या जगण्या—मरण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे हा अतिसंवेदनशील प्रश्न निर्माण होण्याच्या पाठीमागे कारणी भूत कोण असेल तर तो फक्त ‘‘मानव प्राणी’’ व त्यानेच केलेल्या या अक्षम्य चुका असून या गंभीर प्रश्नाला ‘‘ग्लोबल वार्मिंग’’ हे गोंडस नाव देऊन तो मोकळा झाला आहे



मानवाने केलेल्या अमर्याद वृक्षतोडीमुळे त्याचप्रमाणे मानवाच्या पर्यावरण विरोधी भुमिकेमुळे पृथ्वीचे तापमान दिवसेंदिवस वाढत आहे व प्राणवायूचे प्रमाणही घटत आहे. त्यामुळे सजीवसृष्टी लोप पावण्याची भिती निर्माण झाली आहे. यासाठी पर्यावरण पुरक गोष्टी राबविण्याच्या दृष्टीने प्रत्येक मनुष्याने हरित संवर्धनासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. या निर्मल भावनेतून दिनांक १६ जून, २०१७ (श्री. संत तुकाराम महाराज पालखी सोहळा प्रस्थान दिवस) या दिवशी वृक्ष लागवड करून ‘‘जय गणेश हरित वारी अभियान’’ ही संकल्पना सुरू झाली व या अभियानां अंतर्गत श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट पुणे, जगतगुरू श्री. संत तुकाराम महाराज संस्थान देहू, श्री. संत

ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदी, वनराई पुणे, देवराई तळेगांव, देवराई नर्सरी नायगांव पुणे, शहा नर्सरी इंदापूर, आपलं पर्यावरण नाशिक, वृक्षवल्ली चिंचवड, बायोस्पेअर्स पुणे, अशा पर्यावरण व वृक्ष संवर्धनावर कार्य करणाऱ्या २२ संस्था या अभियानावर अविरत कार्य करत आहेत व ''हरित वारी'' हा आमचा संकल्प आहे.



हरित वारी म्हणजे सर्व पालखी महामार्गाच्या दुतर्फा स्वदेशी वृक्षांची लागवड करून त्याचे तीन वर्ष संगोपन करणे (ट्री गार्ड व मेंटनन्स) तसेच सर्व पालखी महामार्गावरील वारकऱ्यांना, गावकऱ्यांना व वृक्षप्रेमींना जोडून या वृक्षांचे संवर्धन करणे असा आमचा हेतू आहे. तसेच पंढरपूर शहरामध्ये १४० व त्यापेक्षा अधिक पालख्या विविध मार्गावरून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून पंढरपूरामध्ये दाखल होतात. या सर्व संतांचे पालखी महामार्ग हरितीकरण करण्याचा आम्हा सर्व वारकऱ्यांचा वृक्षप्रेमींचा **''महासंकल्प''** आहे.

# आमची प्रेरणा



## पद्यश्री श्रीमती सालूमर्दा थिमक्का

थिमक्कांची कथा त्यांच्या कार्याइतरकीच थक्क करणारी आहे. त्यांचे लग्न झाल्यानंतर थिमका हुलिकुल या खेडेगावांत राहिला आल्या. दिवसभर काम करून मिळवलेले पैशात पोट भरायचं अशा परिस्थितीमध्ये हे दोघे पती–पत्नी गावांमध्येच पडेल ते काम करू लागले. लग्नाला अनेकवर्षे उलटली तरी या दोघांना मुल होईना. हुलिकुल सारख्या लहानशा खेडेगावामध्ये या विषयांवर चर्चा होवू लागली आणि या

दोघांना त्याचा त्रास होवू लागला. या गोष्टीकडून लक्ष विचलित करण्यासाठी दोघेही काहीतरी वेगळं करण्याच्या विचारात होते. त्याच वेळी हुलिकल गावाच्या जवळ रस्ता बांधण्यास सुरुवात झाली. या रस्त्याच्या बाजूने झाडं लावण्याची कल्पना थिमक्कांच्या मनात आली. त्यानुसार थिमक्का रोज एक वडाचं झाड या रस्त्याच्या बाजूला लावू लागल्या. या कामामध्ये त्यांना त्यांचे पतीही मदत करायचे. या दोघांनी गावकऱ्यांकडून होणाऱ्या चर्चेकडे दूर्लक्ष करण्याच्या उद्देशाने सुरु केलेल्या या वटवृक्ष लागवडीमधील झाडांची संख्या साडेतीनशेहून अधिक झाली. दोघेही मिळून या झाडांना पाणी घालायचे, त्यांची आपल्या मुलांप्रमाणे काळजी घ्यायचे.

आज हुलिकल गाव येण्याआधीपासूनच चार किलोमीटरवरुन रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वटवृक्षांची रांगच रांग दिसते. रस्त्याच्या दोन्ही बाजूने वडाची झाडं असलेला हा सुमारे चार किलोमीटरचा पट्टा म्हणजे थिमक्का आणि त्यांचे पती यांनी काही दशकांपूर्वी दुतर्फा लावलेली वडाची रोपटी, जी आता वटवृक्ष झाली आहेत. थिमक्का नावाने काम सुरु करणाऱ्या या आजीबाईंना आता 'सालुमार्दा थिमक्का' असं नाव मिळालं आहे. 'सालुमार्दा' या कानडी शब्दाचा अर्थ होतो एका रांगेत लावलेली झाडं. आता थिमक्का यांचा वारसा त्यांचा दत्तक पुत्र असणाऱ्या उमेशनेही सुरु ठेवला आहे व तो रोज एक वृक्ष लावतो. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्व संध्येला देशातील सर्वोच्च पुरस्कारांपैकी असणाऱ्या पद्मश्री पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. त्यातही सर्वात खास नाव आहे ते एका १०६ वर्षांच्या आजीबाईंच. सालुमार्दा थिमक्का यांना पर्यावरणा संदर्भातील योगदानासाठी यंदाचा पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. हुलिकलजवळ त्यांनी अंदाजे ७० वर्षांपूर्वी वडाची ३८४ झाडे लावली आणि त्यानंतर त्यांनी झाडे लावण्याचा सपाटाच सुरु केला. त्यांच्या याच कार्याचा गौरव करण्यासाठी त्यांना यंदा 'पद्मश्री' पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.





'मला पुरस्कार जाहीर झाला आहे. पण मला खरोखर हा पुरस्कार काय असतो याची कल्पना नाही,' ही थिमक्का यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाल्यानंतरची त्यांची पहिली प्रतिक्रिया होती. थिमक्कांना आत्तापर्यंत त्यांच्या या पर्यावरणसंरक्षक कार्यासाठी शेकडो पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या हुलिकुलच्या घरामध्ये अनेक पुरस्कार आणि प्रमाणपत्रे आहेत. सालुमर्दा थिंमक्का यांच्या या महान कार्याची दखल अनेक नामांकित संस्था बरोबरच कर्नाटक राज्याने तर घेतलीच शिवाय केंद्र सरकारनेही घेतली आहे.

१. राष्ट्रीय नागरिक पुरस्कार १९९५

२. इंदिरा प्रियदर्शिनी वृक्षमित्र पुरस्कार १९९७

३. वीरचक्र प्रशस्ती पुरस्कार १९९७

४. कर्नाटक कल्पवल्ली पुरस्कार २०००

५. फिलिप्स बहादुरी पुरस्कार २००६

६. हम्पी विश्वविद्यालय द्वारा नादोजा पुरस्कार २०१०

७. होविनाहोल फाउंडेशन का विश्वम्मा पुरस्कार २०१५

८. बीबीसी द्वारा प्रभावशाली व प्रेरणादायक महिला का सम्मान २०१६

९. आई एंड यू बीइंन टूगेदर फाउंडेशन द्वारा डीवाइन अवार्ड से सम्मानित

१०. आर्ट ऑफ लिविंग संगठन द्वारा विशालाक्षी पुरस्कार

११. ग्रीन चौंपियन पुरस्कार

१२. वृक्षासन पुरस्कार

**१३. भारत सरकारचा पद्मश्री पुरस्कार २०१९**

अशाप्रकारे अनेक पुरस्काराने सालुमर्दा थिंमक्का यांना सन्मानित केलेले आहे आज त्यांचं राहतं घर सुद्धा त्यांना मिळालेले पुरस्कार ठेवण्यासाठी अपुरे पडत

आहे अशा या वृक्ष संवर्धनातील दीपस्तंभाची प्रत्यक्ष ओळख व त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी आम्ही त्यांच्या कर्नाटक मधील राहत्या घरी गेलो व त्यांचे महाराष्ट्रातील हरित वारी अभियानासाठी आशीर्वाद घेतले. त्यावेळी त्यांनी आपल्या या महासंकल्पासाठी एक हजार वडांची झाडे देण्याची तयारी दर्शविली आहे. तसेच महाराष्ट्रातील या हरित वारी अंतर्गत वृक्ष लागवडीच्या कार्यासाठी त्या स्वत: उपस्थित राहणार आहेत.

**सालुमार्दा थिमक्का यांची त्यांच्या राहत्याघरी ह.भ.प.श्री.शिवाजीराव मोरे यांनी भेट घेऊन या हरित वारी महासंकल्पासाठी आशिर्वाद घेतले. त्यावेळचे छायाचित्र.**



# संकल्प व महासंकल्प

**वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे। पक्षीही सुस्वरे आळविती।।**

हा श्री संत तुकाराम महाराजांचा अभंग निसर्गप्रेमाचे उत्तम उदाहरण आहे. पर्यावरणवाद त्यांनी समर्पकपणे सादर केला आहे. वृक्ष हे मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्त्व असलेले व निसर्गाने मानवाला दिलेले अमृत वरदान आहे. वृक्ष हे ऑक्सिजनचे ज्याला आपण प्राणवायू म्हणतो त्याचे ते कारखाने आहेत. प्राणवायू अर्थातच ऑक्सिजन हा सजीवांच्या जीवनातील अतिशय महत्त्वाचा घटक आहे कारण सर्वसामान्य जीव आठ दिवस अन्ना शिवाय राहू शकतो चार दिवस पाण्याशिवाय जिवंत राहू शकतो परंतु ऑक्सिजन शिवाय सजीव पाच मिनिट सुद्धा जिवंत राहू शकत नाही. तरीही मनुष्य वृक्ष संवर्धनाकडे लक्ष देत नाही हे दुर्भाग्य आहे.

एक जीवनछत्र, एक आधार, मानवी जीवन व वृक्ष यांच्यात एक अतूट नाते आहे. मानवाला अन्न, वस्त्र, निवारा या ज्या तीन मूलभूत गरजा आहेत, त्यांची एक यथोचित पूर्ती करणारे हे निसर्गाचे देणे आहे. अनादी कालापासून मानवी जीवनाचा अविभाज्य अंग असलेले, मानवाच्या ऐहिक व आध्यात्मिक जीवनात सतत साथ देणारे, सर्वागी उपयोगी पडणारे, उपयुक्त असणारे, स्थितप्रज्ञ योग्यासारखे, वनचरे व पक्षी यांनाही अन्न, वस्त्र, निवारा देणारे जाती, धर्म, वंश, लिंग, शत्रू–मित्र, गरीब–श्रीमंत, रोगी–निरोगी, साक्षर–निरक्षर, काळा–गोरा, खुजा–उंच इ. कसलाही भेदभाव न करता सर्वाना समभावनेने अंगाखांद्यावर खेळवणारे, वृक्ष हे केवळ मानवच नव्हे, तर सर्व सजीवांचे जीवनदायी तत्त्व आहेत. म्हणूनच संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात **''जो खंडावया घाव घाली। का लावणी जयांनी केली। दोघा एक ची सावली। वृक्षु दे जैसा।।''**

वृक्ष, तोडणारा आणि लागवड करणारा या दोघांनाही सारखीच सावली देतो वृक्ष मानवी जीवनाचे तारक असल्याचे आपल्या पूर्वजांनी जाणले होते व त्यामुळे त्यांनी वृक्ष लागवड, वृक्ष संगोपन इ. सारखे कार्यक्रम सुरू केले व अनाठायी वृक्षतोड होऊ नये म्हणून 'देवराई' सारखे उपक्रम धार्मिक श्रद्धांशी जोडून त्या उपक्रमांना एकप्रकारे सबल अधिष्ठान दिले. भारतीय संस्कृतीत अशा प्रकारचे वृक्षप्रेम अनादी कालापासून आहे, तसेच त्याचे संवर्धन करण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. भारतीय सण, उत्सव आदींमधूनही वृक्षांना अधिष्ठान प्राप्त आहे. वृक्ष भारतीय संस्कृतीत मानाचे स्थान मिळवून आहेत.

वृक्षांना मनुष्याच्या जीवनात खूप महत्त्व व मानाचं स्थान आहे. खरचं वृक्ष नसतील तर मनुष्याचं जगणं सुद्धा मुश्कील होईल. सर्व सजीवांना जीवंत राहण्यासाठी आवश्यक आहे तो म्हणजे ''ऑक्सिजन'' त्याच्या शिवाय मनुष्य किंवा सर्वसामान्य जीव पाच मिनिट सुद्धा जिवंत राहू शकत नाही. वृक्षाचे मानवच नव्हे तर संपूर्ण सजीव सृष्टीवर किती किती उपकार आहेत हे आपल्या लक्षात येईल नुसतेच उपकार नाही तर वृक्ष म्हणजे मनुष्याचे जीवन आहे कारण प्राणवायू म्हणजेच ऑक्सिजन नसेल तर मनुष्य पाच मिनिट सुद्धा जिवंत राहू शकत नाही. मनुष्याच्या जन्मा पासून शेवटच्या घटकेपर्यंत वृक्ष हा आपला सखा सोबती आहे. मनुष्य जन्माला आल्यावर जो लाकडी पाळणा आपल्याला मायेची ऊब देतो ते त्या वृक्षाचेच उपकार आहेत. त्याचप्रमाणे मनुष्याच्या अंत्यविधीला देखील या वृक्षाच समर्पण असतं. याची जाण ठेवून प्रत्येकाने फक्त वृक्षारोपण न करता वृक्षसंवर्धन व त्यांचे पालन, पोषण व संरक्षण यासाठीही प्रयत्न करणं गरजेचं व आवश्यकही आहे.

या निर्मल भावनेतून, ''जय गणेश हरित वारी अभियान'' ही संकल्पना पुढे आली व या अभियानां अंतर्गत श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट पुणे, आर्ट

ऑफ लिव्हींग, जगतगुरू श्री. संत तुकाराम महाराज संस्थान देहू, श्री. संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदी, वनराई पुणे, देवराई तळेगांव, देवराई नर्सरी नायगांव पुणे, शहा नर्सरी इंदापूर, आपलं पर्यावरण नाशिक, वृक्षवल्ली चिंचवड, बायोस्पेअर्स पुणे, अशा पर्यावरण व वृक्ष संवर्धनावर कार्य करणाऱ्या २२ संस्था या अभियानावर अविरत कार्य करत आहेत व हरित वारी हा आमचा संकल्प आहे.




हरित वारी म्हणजे सर्व पालखी महामार्गाच्या दुतर्फा लोक सहभागतून स्वदेशी वृक्षांची लागवड करून त्याचे तीन वर्ष संगोपन करणे (ट्री गार्ड व मेंटनन्स) तसेच सर्व पालखी महामार्गावरील वारकऱ्यांना, गावकऱ्यांना व वृक्षप्रेमींना जोडून या वृक्षांचे संवर्धन करणे असा आमचा प्रमुख हेतू आहे. तसेच श्री. संत तुकाराम महाराज पालखी सोहळा देहू ते पंढरपूर त्याप्रमाणे श्री. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा आळंदी ते पंढरपूर हे दोन्ही पालखी महामार्ग हरित करणे हा आमचा '**संकल्प**' आहे. व पंढरपूर शहरामध्ये १४० व त्यापेक्षा अधिक पालख्या विविध मार्गावर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून दाखल होतात. या सर्व संतांचे पालखी महामार्ग हरितीकरण करण्याचा आम्हा सर्व वृक्षप्रेमींचा **''महासंकल्प''** आहे.

आपल्या सर्वांच्या आर्शिर्वादाने व सहकार्याने आपला हा ''संकल्प व महासंकल्प'' निश्चितच पूर्णत्वास जाईल कारण तुकोबाराय म्हणतात............

**''सत्य संकल्पाचा दाता नारायण ! सर्व करी पूर्ण मनोरथ''**

# पालखी महामार्ग नकाशा



# हरित वारी पालखी महामार्ग
# मंगळवेढा – पंढरपूर
# (पायलट – प्रोजेक्ट)
# !! मार्गदर्शक तथा पथदर्शी प्रकल्प !!

श्री. संत दामाजीपंत, श्री. संत चोखामेळा व श्री. संत कान्होपात्रा व इतर संतांचा पालखी महामार्ग मंगळवेढा ते पंढरपूर आहे. सद्यस्थितीत सदर पालखी महामार्गाचे नुतनीकरण पूर्णत्वास आले आहे. सदर रस्त्याच्या रूंदीकरणामुळे या पालखी महामार्गावरील दुतर्फा असलेली जुने वृक्षे काढण्यात आलेली आहेत.



त्यामुळे सदरचा २३ किलोमीटरचा पालखी महामार्ग वृक्ष नसल्याने ओसाड व भकास झाला आहे. या संकल्प व महासंकल्पाच्या निमित्ताने हा पहिला प्रातिनिधीक स्वरूपातील मार्गदर्शक तथा पथदर्शी टप्पा म्हणून हा मंगळवेढा ते पंढरपूर महामार्ग निवडण्यात आला आहे.

सदर पालखी महामार्गाच्या दुतर्फा देशी वृक्षारोपण करणे आवश्यक आहे. त्याबाबत परवानगी मिळणेबाबत कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, सोलापूर यांना विनंती करण्यात आली होती. त्याप्रमाणे त्यांनी आमच्या विनंतीस मान देऊन कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, सोलापूर यांचेकडील पत्र क्र. रामवि/प्रकल्प/४३९/सन २०१९ दि.२३/०२/२०१९ अन्वये मान्यता दिली आहे. तसेच यास संपूर्णपणे सहकार्य करण्याची तयारी त्यांनी दर्शविली आहे. **सोबत परिशिष्ट १ मध्ये त्याची प्रत जोडली आहे.**

सदर २३ कि.मी. मंगळवेढा ते पंढरपूर या पालखी महामार्गावर दुतर्फा अंदाजे ९२०० देशी वृक्षांची (पिंपळ, वड, चिंच, कडुलिंब इ.) वन विभागाच्या वतीने खड्डे खणून लागवड करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सदर वृक्षांचे पुढील तीन वर्ष संवर्धन व संरक्षण करण्याचे काम श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे वतीने करण्यात येणार आहे. तसेच सदर वृक्षांची लागवड पावसाळ्यापूर्वी दिनांक ५ जून, २०१९ रोजी पर्यावरण दिनी करण्याचे नियोजित आहे.

➢ **तपशिल**

- श्री. संत दामाजी पालखी महामार्ग :— श्रीक्षेत्र मंगळवेढा ते श्रीक्षेत्र पंढरपूर.
- महामार्ग :— २३ किलोमीटर (रा.म.क्र.५६१ अ)

- अंदाजे झाडांची संख्या :— ९२०० — महामार्गाच्या दुतर्फा प्रति ५ मीटर (१६.०४ फुट) अंतरावर वृक्षारोपण करणे.
- अंदाजे ट्रि गार्ड संख्या :— ९२००
- वृक्ष :— पिंपळ, वड, चिंच, कडुलिंब इ. स्वदेशी वृक्ष.





➢ **खर्चाबाबत :—**

| अ. क्र. | तपशिल | | अंदाजे खर्च रक्कम रू. |
|---|---|---|---|
| १ | वृक्ष लागवड (खड्डे खणून रोपण करणे). — सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने. | महामार्गाच्या दूतर्फा नियमानुसार खड्डे खणून वृक्ष लागवड करणे व वृक्षासहित त्याची अंदाजे किंमत रू.१५०/— प्रतिनग आहे. | ९२०० X१५० = १३८०००० (अक्षरी :— तेरा लाख ऐंशी हजार रूपये मात्र) |
| २ | ट्रि गार्ड — लोकसहभाग व | झाडाचे संरक्षण करणेकामी पिंजरा (ट्रि गार्ड) बसविणे. | १०००X९२००= ९२००००० (अक्षरी |

| | | | |
|---|---|---|---|
| | सीएसआर फंड. | त्याची अंदाजे किंमत रू. १०००/— प्रतिनग आहे. | :— ब्यान्नव लाख रूपये मात्र) |
| ३ | सेंद्रीय खत — श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या वतीने. | झाडाचे संवर्धन करणेकामी सेंद्रीय खत देणे. त्याची अंदाजे किंमत रू.१५/— आहे. | १५X९२००= १३८००० (अक्षरी :— एक लाख अडोतीस हजार रूपये मात्र) |
| ४ | पाणी पुरवठा (३ वर्षे) श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या वतीने. | झाडांचे संवर्धन करणेकामी प्रत्येक झाडांना आठवडयातून एक वेळेप्रमाणे वर्षातून ४८ वेळा पाणी पुरवठा करणे. | २४०X३X९२०० = ६६२४००० (अक्षरी :— सहासष्ट लाख चोवीस हजार रूपये मात्र) |
| ५ | लोक प्रबोधन, इतर व आस्कमिक खर्च (३ वर्षे) | वृक्षसंदर्भाबाबत नागरिकांना महत्व पटवून देणेसाठी महामार्गावरील गावांमध्ये लोक प्रबोधनात्मक किर्तन, प्रवचण, वृक्ष सप्ताह, व्याख्यानमाला आयोजित करणे. तसेच विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करणे. तसेच इतर अनुषंगीक | १०००००० (अक्षरी :— दहा लाख रूपये मात्र) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आस्कमिक खर्चाबाबत. | |
| ६ | वृक्ष संरक्षण | महामार्गावरील झाडांचे वृक्ष संरक्षण करण्यासाठी. तसेच याबाबत महामार्गावरील ग्रामपंचायत, शाळा, महाविद्यालय व वृक्षमित्र यांची मदत घेणे. | १००००० (अक्षरी :– एक लाख रूपये मात्र) |
| | **एकूण** | **रू.१,८४,४२,०००/– (अक्षरी :– एक कोटी चौऱ्याऐंशी लाख बेचाळीस हजार रूपये मात्र)** | |

**सदर हरित वारी अभियानासाठी देणगी द्यावयाची असल्यास श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरच्या खालील बॅंक खात्यात NEFT/RTGS द्वारे जमा करावी किंवा ''कार्यकारी अधिकारी,श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर'' या नावाने धनादेश / डिडिद्वारे पाठवू शकता.**


बॅंक :– सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, पंढरपूर.

नाव :– कार्यकारी अधिकारी,श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

क्रमांक :- 2094251767

IFSC Code :- CBIN0283145

वृक्ष लागवडीचा कार्यक्रम :— दिनांक ५ जून, २०१९ रोजी पर्यावरण दिनी





# या कार्यात सहभागी वृक्षप्रेमी संस्था / व्यक्ती.

१. श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर.

२. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट, पुणे.

३. जगत्गुरू श्री. संत तुकाराम महाराज संस्थान, देहू.

४. संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज संस्थान, आळंदी.

५. ऑर्ट ऑफ लिव्हींग, बेंगलोर.

६. सामाजिक वनीकरण विभाग, सोलापूर.

७. वनराई, पुणे.

८. देवराई तळेगांव.

९. देवराई नर्सरी.

१०. ‘आपलं पर्यावरण’ नाशिक

११. बायोस्पीयर्स, पुणे.

१२. शहा नर्सरी इंदापूर.

१३. वृक्षवल्ली, पिंपरी चिंचवड.

१४. वारी परिवार, मंगळवेढा.

१५. पंढरपूर ते मंगळवेढा महामार्गावरील सर्व नगरपरिषद, ग्रामपंचायती, शाळा, महाविद्यालये व इतर वृक्षमित्र.

# परिशिष्ट :– १

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**राष्ट्रीय महामार्ग विभाग, सोलापूर.**
**सात रस्ता, सोलापूर ४१३००३**

| | |
|---|---|
| ☎ ०२१७-२३१५०२० | E-mail-nh1solapur.ee@mahapwd.com |
| जा.क्र./रामवि/ प्रकल्प / ४५४ / सन २०१९ | दिनांक : २३ / ०२ /२०१९ |

प्रति,
ह.भ.प. शिवाजीराव सदशिवराव मोरे,
सदस्य श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती,
श्री क्षेत्र पंढरपूर.

**विषय :- मंगळवेढा ते पंढरपूर या पालखी महामार्गाच्या दुतर्फा वृक्षारोपण करणेबाबत...**

संदर्भ :- १. आपले दिनांक ५-१०-२०१८ रोजीचे परवानगी मागणी पत्र.
२. जिल्हा नियोजन अधिकारी, समिती सोलापूर यांचे पत्र जिनिस/पंतीक्षेवि/सांस-१/२०१८-१९/२८१०/२०१८ दिनांक ८-१०-२०१८.

वरील संदर्भिय विषयास अनुसरुन आपले संदर्भिय पत्र क्र.-१ संदर्भिय पत्र क्र.-२ सह या कार्यालयास प्राप्त झाले आहे. संदर्भिय पत्र क्र.-१ मध्ये उल्लेख केलेप्रमाणे आपण मंगळवेढा ते पंढरपूर या महामार्गाच्या दुतर्फा वृक्षारोपण व तीन वर्ष या वृक्षांचे संवर्धन करणेबाबत परवानगी मागितली आहे.

तरी टेंभूर्णी-पंढरपूर-मंगळवेढा-उमदी-विजापूर रा.म.क्र.-५६१ अ या महामार्गाच्या पंढरपूर ते मंगळवेढा या भागात वृक्ष लावणे व त्यांची तीन वर्षे जोपासना करणे असे वनविभागाच्या नियमास अनुसरुन, तसेच वृक्षारोपण करणा-या व त्यांची जोपासन करणा-या व्यक्तीची पुर्णपणे आपली जबाबदारी राहील या अटी व शर्तीसह परवानगी देण्यात येत आहे.

**कार्यकारी अभियंता**
**राष्ट्रीय महामार्ग विभाग सोलापूर**

प्रत :- जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर यांना माहितीसाठी रवाना.

Dell/D/Rajguru Folder/db letter

132

# विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण सोलापूर यांचे कार्यालय

स्मृती उद्यान, वसंत नगर जवळ विजापूर रोड सोलापूर - ४१३ ००४

ईमेल - sfdsolapur@gmail.com.

दुरध्वनी क्र. ०२१७ २३४३३९०


पत्र

ई-मेलव्दारे

विषय - मंगळवेढा ते पंढरपुर या पालखी महामार्गाच्या दुतर्फा वृक्षारोपण करणेबाबत.

जा.क्र.ब./सावनि/सर्व्हेक्षण/50कोटी/1486 /सन 2018-19

सोलापूर- 413 004 दिनांक - 19 /03/2019

प्रति,

ह.भ.प.शिवाजीराव मोरे,
सदस्य् श्री विठठल रुक्मिणी मंदिर समिती,
श्री क्षेत्र पंढरपूर.

संदर्भ - 1) आपलेकडील दि.08/03/2019.रोजीचे पत्र

उपरोक्त् संदर्भिय पत्राचे अनुषंगाने सुचित करणेत येते की, विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण) सोलापूर विभागा मार्फत सन 2019 चे पावसाळयात 33 कोटी वृक्ष लागवड अंतर्गत खालील प्रमाणे लागवड करणेत येणार आहे.

| अ.क्र. | तालुका | साईटचे नाव | क्षेत्र | लागवड करणेत येणारी रोपे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | पंढरपुर | पंढरपुर ते सिध्देवाडी | 10 कि.मी | 5000 | |
| 2 | मंगळवेढा | सिध्देवाडी ते मंगळवेढा | 08 कि.मी | 4000 | |

या 18 कि.मी पालखी महामार्गावर 9000 खड्डे विभागामार्फत खोदणेत येणार असून जुन महिन्यात पिपंळ, वड, चिंच, कडुलिंब इ. या प्रजातीचे 9000 वृक्षांची लागवड करणेत येणार आहे. तसेच सदर वृक्षांची पुढील 3 वर्ष संवर्धन व संरक्षण करणेचे काम श्री. विठ्ठल रुक्मीणी मंदीर समिती पंढरपुर यांचे मार्फत करणेत येईल.

प्रकरणी या पालखी महामार्गावर सामाजिक वनीकरण विभागामार्फत खडडे खोदून लागवड करण्यात येईल.

(सौ.एस.आर.माने)
विभागीय वन अधिकारी
सामाजिक वनीकरण सोलापूर

प्रतिलिपी - वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण मंगळवेढा, पंढरपूर यांना योग्य् कार्यवाहीसाठी रवाना.

# परिशिष्ट :– २

श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर
दिनांक ०३/०७/२०१८ रोजीच्या सभेतील लागुपुरता उतारा

**विषय क्रमांक :८(घ):– गोशाळेतील शेणखत पंढरपूर हरीत अभियानामध्ये वापर करणेबाबत.**

ठराव क्रमांक :८(घ):– पंढरपूर येथे मंदिराच्या अखत्यारितीत नगरपालिका हद्दीत यमाई तलाव येथे गोशाळा आहे. या गोशाळेत साधारण १३२ लहान मोठया गीर जातीच्या गायी आहेत. सदर गोशाळेच्या गाईंपासून मोठया प्रमाणात शेणखत उपलब्ध होते. सदरचे शेणखत मंदिर समितीकडून लिलाव प्रक्रिया राबवून विक्री केले जाते. तथापि, पंढरपूर शहर व परिसर, ६५ एकर, पालखी मार्ग, पालखी तळ इ. ठिकाणी मोठया प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आली आहे व येत आहे. सदरची झाडे चांगल्या पध्दतीने जतन करण्यासाठी शेणखताची आवश्यकता असते. त्यानुसार गोशाळेत शेणखत सदर झाडांसाठी मोफत उपलब्ध करून द्यावे अशी मा. सदस्य ह.भ.प. शिवाजीराव सदाशिवराव मोरे यांनी मागणी केली आहे असल्याचे कार्यकारी अधिकारी यांनी सभेत सांगीतले. त्यावर सविस्तर चर्चा होवून, गोशाळेतील शेणखत हरित अभियानासाठी देण्याचे सर्वानुमते ठरले.

---

(सत्यप्रत)

14/04/2019

कार्यकारी अधिकारी,
श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जि. सोलापूर.

श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिति, पंढरपूर

दिनांक ०१/१०/२०१८ रोजीच्या सभेतील लागुपुरता उतारा

**विषय क्रमांक :१३(ख):— मंदिर समितीच्या माध्यमातून श्री क्षेत्र पंढरपूर व परिसर हरित करणे.**

ठराव क्रमांक :१३(ख):— अमर्याद वृक्षतोडीमुळे त्याचप्रमाणे मानवाच्या पर्यावरण विरोधी भुमिकेमुळे पृथ्वीचे तापमान दिवसेंदिवस वाढत आहे व प्राणवायूचे प्रमाणही घटत आहे. त्यामुळे सजीवसृष्टी लोप पावण्याची भिती निर्माण झाली आहे. यासाठी पर्यावरण पुरक गोष्टी राबविण्याच्या दृष्टीने प्रत्येक मनुष्याने हरित संवर्धनासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. या निर्मल भावनेतून, "जय गणेश हरित वारी अभियान" ही संकल्पना पुढे आली व या अभियानां अंतर्गत श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट पुणे, वनराई पुणे, देवराई तळेगांव, आपलं पर्यावरण नाशिक, वृक्षवल्ली चिंचवड, बायोस्पेअर्स पुणे अशा पर्यावरण व वृक्ष संवर्धनावर कार्य करणाऱ्या २२ संस्था या अभियानावर अविरत कार्य करत आहेत व हरित वारी हा आमचा संकल्प आहे.

तसेच हरित वारी म्हणजे देहू ते पंढरपूर व आळंदी ते पंढरपूर या पालखी महामार्गाच्या दुतर्फा स्वदेशी वृक्षांची लागवड करून त्याचे तीन वर्ष संगोपन करणे (ट्री गार्ड व मेंटनन्स) तसेच दोन्ही पालखी महामार्गावरील वारकऱ्यांना व वृक्षप्रेमींना जोडून या वृक्षांचे संवर्धन करणे असा आमचा हेतू आहे. आमच्या या अभियाना अंतर्गत श्रीक्षेत्र पंढरपूर मध्ये ९८९२३ देशी वृक्ष लावण्याचा आमचा मानस आहे. या अभियानामध्ये मंदिर समितीने सहभाग नोंदवणे आवश्यक असल्याचे मा. सदस्य श्री.ह.भ.प. शिवाजीराव मोरे यांनी सभेत सांगीतले.

त्यावर सविस्तर चर्चा होवून, सदर हरित वारी अभियानामध्ये मंदिर समितीचा सहभाग नोंदविण्याचे व त्यासाठी आवश्यक तो खर्च मंदिर समितीच्या निधीतून करण्याचे सर्वानुमते ठरले.

---

(सत्यप्रत)

14/02/2019

कार्यकारी अधिकारी,
श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जि. सोलापूर.

# संदेश



झाडाविना ढग गेले !

ढगाविना पाणि गेले !!

पाण्याविना शेती गेली !

शेतीविना समृध्दी गेली !!

समृध्दीविना सारे हवालदिल झाले !

इतके सारे अनर्थ वृक्ष तोडीने केले !!

निसर्ग हा म्हणून कोपला,

त्याची जाणीव ठेवा !

त्यासाठीच संदेश हा,

झाडे लावा झाडे जगवा !!

# हरित वारीसाठी संपर्क तपशिल

| | | |
|---|---|---|
| **नाव** | :– | ह.भ.प. श्री. शिवाजीराव सदाशिवराव मोरे |
| **पद** | :– | सदस्य, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर, जि. सोलापूर. |
| **कार्यालय पत्ता** | :– | श्री. संत तुकाराम भवन, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर, जि. सोलापूर – ४१३३०५. |
| **निवास पत्ता** | :– | रा. श्रीक्षेत्र देहु, बाजारपेठ, ता. हवेली, जि. पुणे – ०९. |
| **संपर्क क्र.** | :– | ९८२२५४५२८५ व ९१६८५४५२८५ |
| **कार्यालय दुरध्वनी क्र.** | :– | ०२१८६– २२४४६६, २२३५५० |
| **ई मेल** | :– | shivajimore1960@gmail.com<br>eotemple@gmail.com |
| **संकेतस्थळ** | :– | www.vitthalrukminimandir.org |

# समारोप

अध्यात्म आणि पर्यावरण या दोन मानवी वास्तव कल्याणकारी घटकांचा समतोल, समन्वय साधून जगातील मानवाने आपली भौतिक व्यावहारिक तथा पारमार्थिक वाटचाल जर केली तर निश्चितच जगातील हा मानव खऱ्या अर्थाने सुख समृद्ध झाल्याशिवाय राहणार नाही.

या शुध्द जाणिवेतून आम्ही हा हरित पालखी महामार्गाचा संकल्प व महासंकल्प केलेला आहे. आपणही या वृक्ष सेवेत सहभागी होऊन या सृष्टीच्या ऋणातून मुक्त व्हावे ही प्रार्थना ......



# ! राम कृष्ण हरी !